# नवी मुंबई महानगरपालिका

## स्थायी समिती

स्थायी समितीच्या **दिनांक २७ जानेवारी २०११** रोजी भरलेल्या सभेतील **मंजूर/नामंजूर** इ. ठरावाची माहिती संक्षिप्त आणि मसूदा स्वरुपात खालील प्रमाणे आहे:-

**विषय क्र.१**
**दि.२७जानेवारी२०११**

सानपाडा से-१८ येथील आयडीबीआय बँक ते महावीर अमृत बिल्डिंग पर्यंत रस्त्याची डांबरीकरणाने सुधारणा करण्याच्या कंत्राटाबाबत, आयुक्तांचे दि.०७/०१/२०११ चे पत्र क्र.नमुंमपा/श.अ./७७/२०११.

ठराव क्र.३६४.
**दि.२७जानेवारी२०११**

"उपरोक्त विषयासंदर्भात मे.आजवानी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. या कंत्राटदाराबरोबर त्यांनी कार्यालयीन अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३.३३ % कमी दराने एकुण रु.२३,७०,५०८/- इतक्या खर्चाने करार करण्यास तसेच नियमानुसार भाववाढीपोटी देय असलेल्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, संमती देण्यात यावी."

**निर्णय:- संमत.**

**विषय क्र.२**
**दि.२७जानेवारी२०११**

नेरुळ से-१० ए येथील रस्त्याची डांबरीकरणाने सुधारणा करण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दि.१०/०१/२०११ चे पत्र क्र.नमुंमपा/श.अ./८४/२०११.

ठराव क्र.३६५.
**दि.२७जानेवारी२०११**

"उपरोक्त विषयासंदर्भात अंदाजपत्रकिय रक्कम रु.२३,५८,४०९/- इतकी असून सदर खर्चास तसेच नियमानुसार देय असलेल्या भाववाढीच्या रक्कमेस सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी."

**निर्णय:- मंजूर.**

**विषय क्र.०३**
**दि.२७जानेवारी२०११**

कोपरखैरणे प्र.क्र.२७, से-१९ खाडी रोड येथील स्मशान भूमी ते एकविरा देवी मंदिरापर्यंत फुटपाथ बांधण्याच्या कंत्राटाबाबत, आयुक्तांचे दि.१५/०१/२०११ चे पत्र क्र.नमुंमपा/श.अ./१२८/२०११.

ठराव क्र.३६६.
**दि.२७जानेवारी२०११**

"उपरोक्त विषयासंदर्भात मे.प्रविण एंटरप्रायझेस या कंत्राटदाराबरोबर त्यांनी कार्यालयातील अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.९५ % जास्त दराने एकुण रु.२१,२९,७१३/- इतक्या खर्चाने करार करण्यास तसेच नियमानुसार भाववाढी पोटी देय असलेल्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, संमती देण्यात यावी."

**निर्णय:- संमत.**

**विषय क्र.०४**
**दि.२७जानेवारी२०११**

कोपरखैरणे विभागातील प्र.क्र.२७, से-१९ खाडी रोड येथील श्यामवन सोसायटी ते मधुकर पाटील यांच्या घरापर्यंत फुटपाथ बांधण्याच्या कंत्राटाबाबत, आयुक्तांचे दि.१५/०१/२०११ चे पत्र क्र.नमुंमपा/श.अ./१२९/२०११.

ठराव क्र.३६७.
**दि.२७जानेवारी२०११**

"उपरोक्त विषयासंदर्भात मे.प्रविण एंटरप्रायझेस या कंत्राटदाराबरोबर त्यांनी कार्यालयातील अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.९५ % जास्त दराने एकुण रु.१४,३९,७०८/- इतक्या खर्चाने करार करण्यास तसेच नियमानुसार भाववाढी पोटी देय असलेल्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, संमती देण्यात यावी."

**निर्णय:- संमत.**

**विषय क्र.०५**
**दि.२७जानेवारी२०११**

नेरुळ से-१ एन एल-२ कंपाउंड ते शिरवणे जलउद्‌चन केंद्रापर्यंतच्या रस्त्याचे रुंदीकरण करणे व गटाराची पुर्नबांधणी करण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दि.१४/०१/२०११ चे पत्र क्र.नमुंमपा/श.अ./१३५/२०११.

ठराव क्र.३६८.
**दि.२७जानेवारी२०११**

"उपरोक्त विषयासंदर्भात अंदाजपत्रकिय रक्कम रु.१७,२२,५४९/- (५ टक्के आकस्मिक खर्चासह) इतकी असून सदर खर्चास तसेच नियमानुसार देय असलेल्या भाववाढीच्या रकमेस सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी."

**निर्णय:- मंजूर.**

**विषय क्र.०६**
**दि.२७जानेवारी२०११**

नेरुळ से.२१ संत गाडगेबाबा उद्यान (रॉक गार्डन) बघण्याकरीता नागरिकांना मासिक, वार्षिक व शैक्षणिक सहलीतील विद्यार्थ्यांना प्रवेश शुल्क तसेच टॉय ट्रेनकरीता तिकीट शुल्क आकारणे त्याचप्रमाणे जेष्ठ नागरीकांना विनामूल्य प्रवेश उपलब्ध करुन देण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दि.१७/०१/२०११ चे पत्र क्र.नमुंमपा/उद्यान/२१२१/२०११.

**ठराव क्र.३६९.**
**निर्णय:- आयुक्तांकडे फेरविचारार्थ परत.**

**विषय क्र.०७**
**दि.२७जानेवारी२०११**

रुपये पन्नास हजारापेक्षा जास्त परंतु दहा लाखापेक्षा कमी खर्चाच्या कामासंबंधी केलेल्या कराराबाबत, आयुक्तांचे दि.१८/०१/२०११ चे पत्र क्र.नमुंमपा/श.अ./१६६/२०११.

**ठराव क्र.३७०.**
**निर्णय:- दफ्तरी दाखल.**

**विषय क्र.०८**
**दि.२७जानेवारी२०११**

शिक्षण मंडळाचा सन २०००-०१, २००१-०२, २००२-०३, २००३-०४ आणि २००४-०५ या कालावधीतील लेखा परिक्षण अनुपालन अहवालाबाबत, आयुक्तांचे दिनांक ०७/११/२००८ चे पत्र क्र.नमुंमपा/शिक्षण मंडळ/२४०९/२००८.

**ठराव क्र.३७१.**
**निर्णयः- आयुक्तांकडे फेरविचारार्थ परत.**

**विषय क्र.०९**
**दि.२७जानेवारी२०११**

महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघ (फेस्कॉम) आयोजित ३० व्या अधिवेशनास आर्थिक सहाय्य करण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दि.२४/०१/२०११ चे पत्र क्र.नमुंमपा/योजना/ज्ये.ना./१२८/२०११.

**ठराव क्र.३७२.**
**दि.२७जानेवारी२०११**

"उपरोक्त विषयासंदर्भात महाराष्ट्रातील ज्येष्ठ नागरिकांच्या समग्र कल्याणासाठी विविध कल्याणकारी उपक्रम, ज्येष्ठांचे हक्क व समस्याबाबत जागृत्ता निर्माण करण्याचे समाजोपयोगी कार्य महासंघाच्या माध्यमातून होत असल्यामुळे व पर्यायाने या अधिवेशनामुळे नवी मुंबई चे नावलौकीक संपूर्ण राज्यभर होणार असल्यामुळे नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने या अधिवेशनासाठी रु.३.०० लक्ष मात्र आर्थिक सहाय्य करणेस सुचविल्याप्रमाणे, मंजुरी देण्यात यावी."

**निर्णयः- मंजूर.**

**विषय क्र.१०**
**दि.२७जानेवारी२०११**

समाजकल्याण व झोपडपट्टी सुधार समिती अंतर्गत महानगरपालिका शाळेतील इ.१०वी मध्ये शिकत असणा-या विद्यार्थांकरीता गुणवत्ता वाढीसाठी विशेष शिकवणी वर्गाचे आयोजन करण्याच्या कंत्राटाबाबत, आयुक्तांचे दि.२४/०१/२०११ चे पत्र क्र.नमुंमपा/योजना/१२९/२०११.

**ठराव क्र.३७३.**
**दि.२७जानेवारी२०११**

"उपरोक्त विषयासंदर्भात नवी मंबई महानगरपालिका शाळेतील इ.१०वी च्या ०८ तुकड्यांमधील ४१५ विद्यार्थ्यांकरीता विशेष शिकवणी वर्गाचे आयोजन करणेकरीता मे.एम.टी.एज्युकेयर या संस्थेस प्रती तुकडी रु.२,३०,०००/- या दराने विशेष शिकवणी वर्गाचे आयोजन करणेची निविदा स्विकारणेस आणि सदर विशेष शिकवणी वर्गाचे आयोजन करणेकरीता होणारा एकूण खर्च रक्कम रु.१८,४०,०००/- इतक्या खर्चाने करार करण्यास, सुचविल्याप्रमाणे, संमती देण्यात यावी."

**निर्णयः- संमत.**